MHND250002672022

| | | |
|---|---|---|
| दाखल केल्याचा दिनांक | – | ०९.०६.२०२२ |
| नोंदणी केल्याचा दिनांक | – | ०९.०६.२०२२ |
| पारीत केल्याचा दिनांक | – | ०७.०५.२०२६ |
| कालावधी | – | वर्ष महिना दिवस<br>०३ १० २८ |

**उमरी येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, उमरी यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी के.एस.कुलकर्णी)**
**नियमीत फौजदारी खटला क्र.४४/२०२२**

**नि.क्र.१७.**

**भाग–अ**

| | |
|---|---|
| **प्रथम खबर तपशिल** | उमरी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ९७/२०२२ चा भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. |
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत - पोलीस ठाणे अंमलदार,<br>उमरी पोलीस ठाणे, |
| **सरकारी अधिवक्ता** | श्रीमती. एन. पी. कोरेवाड,<br>सहा. सरकारी अभियोक्ता |
| १. | **प्रकाश भुजंग सोनकांबळे,**<br>वय– ३७ वर्षे, व्यवसाय–मिस्त्रीकाम. |
| २. | **भिमराव भुजंग सोनकांबळे,**<br>वय– ३४ वर्षे, व्यवसाय–मजुरी |
| ३. | **भुजंग लक्ष्मण सोनकांबळे,**<br>वय– ६० वर्षे, व्यवसाय–शेती. |
| ४. | **शोभाबाई भुजंग सोनकांबळे,**<br>वय– ४८ वर्षे, व्यवसाय–घरकाम.<br>सर्व रा. हुंडा (उ.प) ता.उमरी. |
| **आरोपींतर्फे अधिवक्ता** | श्री. डी.डी. खाडे. |

## भाग–ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०७.०४.२०२२ |
| प्रथम खबरीचा दिनांक | ०९.०४.२०२२ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | ०९.०६.२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०३.०८.२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १८.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | ––– |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०७.०५.२०२६ |
| आदेशाचा दिनांक | ––– |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपींचे नांव | अटकेची तारीख | जामीनवर मुक्त केल्याची तारीख | आरोप | दोषी अगर निर्दोष | शिक्षा | भा.ना.सु.स. चे कलम ४६८ अन्वये करीताचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रकाश भुजंग सोनकांबळे | ११.०४.२०२२ | फौ.प्र.स. ४१ (१) (अ) नोटीस प्रमाणे | भा.द.वी कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ | निर्दोष मुक्त | नाही | - |
| २ | भिमराव भुजंग सोनकांबळे | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३ | भुजंग लक्ष्मण सोनकांबळे | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ४ | शोभाबाई भुजंग सोनकांबळे | -- | -- | -- | -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

## ( पारीत दिनांक ०७ मे, २०२६ )

आरोपींविरुध्द **भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४** प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

२. दिनांक ०७.०४.२०२२ रोजी सायंकाळी ०७.३० वाजेच्या सुमारास मौजे हुंडा ता.उमरी येथे फिर्यादी गावातील सार्वजनीक बोरवर पाणी भरण्यासाठी गेल्या असता सर्व आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी व त्यांच्या पतीस शिवीगाळ केली व मुलास थापडाने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच, आरोपी क्र.१ यांनी हातात दगड घेवून फिर्यादीच्या पोटात मारले त्यामुळे त्या बेहोश होउन खाली पडल्या. त्यावेळी सदरचे भांडण साहेबराव कारेवाड व साईनाथ मठपती यांनी सोडवले. त्यामुळे फिर्यादीने उमरी पोलीस स्टेशनला घटनेची फिर्याद दिली.

३. त्याप्रमाणे, उमरी पोलीस ठाणे येथे **गुन्हा नोंद क्र. ९७/२०२२** चा भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो.ना./१०१७ टी.व्ही. केंद्रे, उमरी पोलीस स्टेशन यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळाचा पंचनामा करुन मुद्देमाल जप्त केला. तपासाअंती त्यांनी आरोपींविरुध्द भा.द.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पुर्व न्यायाधिश यांनी आरोपींविरुध्द भा.दं.वि. **कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४** अन्वये **(नि.क्र.११)** अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपींस दोषारोप त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले.

५. फिर्यादीच्या साक्षीपुराव्यात आरोपींविरुध्द दोषदर्शित पुरावा मिळून न आल्याने, आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदवण्यात आले नाही.

६. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद, उपलब्ध पुरावा यांचे अवलोकन केल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारासाठी उपस्थित होतात. त्या मुद्दयांवरील निष्कर्ष कारणांसहीत मी खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०७.०४.२०२२ रोजी ०७.३० वाजणेच्या सुमारास मौजे हुंडा (उ.प.) ता. उमरी जि. नांदेड येथे आरोपींनी संगणमत करुन आरोपी क्र.१ ने फिर्यादीस दगडाने पोटात मार देवून इच्छापुर्वक दुखापत करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय? | **नाही.** |
| २. | उपरोक्त कालावधीत आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी व त्यांच्या मुलास थापडाने मारहाण करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३२३ सहकलम ३४** अन्वये गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय ? | **नाही.** |
| ३. | उपरोक्त कालावधीत आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी व त्यांच्या मुलास सार्वजनिक शांतता बिघडविण्याच्या उद्देशाने प्रोत्साहीत करण्यासाठी शिवीगाळ करुन त्यांचा अपमान करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय ? | **नाही.** |
| ४. | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी आरोपींनी संगणमताने फिर्यादी व त्यांच्या मुलास फौजदारीपात्र धाकदपटशा करुन जिवे मारण्याची धमकी देवून त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ५०६ सहकलम ३४ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय ? | **नाही.** |
| ५. | काय आदेश ? | **आरोपींस दोषमुक्त करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा १ ते ४ साठीः–**

७. मुद्दा क्र.१ ते ४ संबंधीत आलेला अभियोगपक्षाचा पुरावा एकसारखा असून संक्षिप्ततेकरिता मुद्दा क्र.१ ते ४ यांचे मी एकत्रीत विवेचन करुन उत्तर देत आहे.

८. आरोपींवर ठेवलेले आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने सादर केलेल्या साक्षी पुराव्यांचे विवेचन करण्याआधी एक बाब नमुद करणे आवश्यक वाटते ती म्हणजे फिर्यादी **(सा.क्र.१)** व आरोपी यांनी त्यांचेमध्ये **(नि. क्र.१३)** वरील पुरशीस अन्वये आपापसातील भविष्यातील संबंध चांगले रहावेत याकरीता प्रस्तुत प्रकरणात तडजोड झालेली असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे, साक्षी पुरावे हे सदर तडजोडीच्या अनुषंगाने विवेचित करीत आहे.

९. यासदंर्भात, फिर्यादी **(सा.क्र.१)**, यांनी त्यांच्या सरतपासादरम्यान अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा उलटतपास घेतला. परंतु, उलटतपासा दरम्यान देखील त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे फिर्यादी **(सा.क्र.१)** यांचा साक्षीपुरावा देखील अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

१०. आरोपीच्या वकीलांनी **(नि.क्र.१४)** घटनास्थळ पंचनामा व **(नि.क्र.१५)** कडील वैद्यकिय प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे मान्य केलेले असले तरी फिर्यादी **(सा.क्र.१)** यांचा अभियोग पक्षास बळकटी देणारा प्रत्यक्ष पुरावा अभिलेखावर नाही.

११. कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार फौजदारी खटल्यांमध्ये आरोपीच्या दोषसिध्दीकरीता साक्षीपुराव्यामधुन अपराधाची बाब निसंशयातीतरीत्या सिध्द होणे अत्यावश्यक आहे. सबब, फिर्यादी **(सा.क्र.१)** व आरोपींमधील झालेल्या तडजोडीच्या अनुषंगाने आलेला अभिलेखावरील पुरावा पाहता मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, आरोपींवर ठेवलेले आरोप सिध्द होत नाहीत. म्हणुन, मी **मुद्दा क्र.** १ **ते** ४ चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**मुद्दा क्र. ५ करीताः-**

१२. आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द न झाल्यामुळे त्यांना खटल्यामधून दोषमुक्त करणे न्यायोचित आहे. सबब, **मुद्दा क्र. ५** च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत

आहे.

## आ दे श

१. आरोपीं क्र.**१. प्रकाश भुजंग सोनकांबळे, २. भिमराव भुजंग सोनकांबळे, ३.भुजंग लक्ष्मण सोनकांबळे** व **४. शोभाबाई भुजंग सोनकांबळे,** यांना **भारतीय दंड संहितचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४** अन्वयेच्या दोषारोपातून भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७१(१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन कदबे व जात मुचलके रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अनुसार प्रत्येकी रक्कम **रु.७,५००/-** प्रमाणे जात मुचलका व जामीन कदबा द्यावा.

४. जप्त मुद्देमाल 'एक ओबड धोबड आकाराचा फिकट रंगाचा दगड, अंदाजे एक ते दिड किलो वजनाचा' मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

५. प्रस्तुतच्या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर)

KULDIP SUBASHRAO KULKARNI
Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2026.05.07 15:49:22 +0530

दिनांक- ०७.०५.२०२६.
ठिकाण- उमरी

**( के.एस.कुलकर्णी )**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, उमरी.

## परिशीष्ट

## भाग-क

## अभियोगपक्ष/आरोपीपक्ष/न्यायालयापक्षाचे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नांव | नि.क्र. | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | शेषाबाई बाबु गायकवाड | १२ | फिर्यादी |

**अभियोगपक्ष/आरोपीपक्ष/न्यायालयापक्षा यांचे कागदपत्रांची निशाणी यादी**

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| १. | १४ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | १५ | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र |

**भौतिक वस्तु**

| अ.क्र. | स्वरुप |
|---|---|
| १. | एक ओबध धोबड आकाराचा फिकट रंगाचा दगड अंदाजे एक ते दिड किलो वजनाचा. |

KULDIP SUBASHRAO KULKARNI
Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2026.05.07 15:49:29 +0530

दिनांक- ०७.०५.२०२६.
ठिकाण- उमरी

**( के.एस.कुलकर्णी )**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, उमरी.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G. B. Wavdhane, Stenographer Gr.III (On Deputation) |
| Court | - | CJJD & JMFC Umri |
| Date | - | 07.05.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | - | 07.05.2026 |
| Order uploaded on | - | 07.05.2026 |